भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ४७०/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २६/०६/२०१७

**१) समोरील दाराची संकल तोडुन आलमारीतील सोन्याचे दागीणे व कागदपत्रे चोरुन नेल्याने गुन्हा नोंद .:—**

दिनांक २९/०४/२०१७ चे १२.०० वा. ते २५/०६/२०१७ चे ८.४५ वा. दर. यातील फिर्यादी हे घराला ताला लावुन आपले कुटुबांसह स्वगावी गेले असता कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन समोरील दाराची संकल तोडुन आत प्रवेश करुन किचन मधील आलमारीरीत ठेवलेली १ सोन्याची अंगठी १० ग्रॅम किंमती २५,०००/—रु. व कागदपत्रे असा एकुण २५,०००/—रु. चा माल चोराने नेल्याने फिर्यादी नवनाथ साधु बनसाडे वय ३२ वर्ष, रा. गातेगाव जि. लातुर ह. मु. महिपाल रंगारी प्लॉट क्र. १३३ आशिर्वाद नगर गिरोला यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ४५४,४५७,३८० भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मनगटे पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

**२) मोटार सायकलची चोरी .:—**

दिनांक २३+२४/०६/२०१७ चे १३.३० वा. ते १४.३० वा. दर. यातील फिर्यादी आपली बजाज पल्सर मोटार सायकल क्रमांक एमएच ३६/एस ९२१६ किंमती ४०,०००/—रु. ची खुल्या जागेत ठेवलेली असता कोणीरती अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन मोटार सायकल चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन करडी येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सलामे पो.स्टे. करडी हे करीत आहेत.

**३) ट्रॅक्टर चालकांच्या निष्काळजीपणामुळे मोटार सायकल चालकाला धडक मारुन जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद .:—**

दिनांक २५/०६/२०१७ चे ०९.३० वा. दर. यातील जखमी फिर्यादी हेमराज माधवराम गौतम वय ५५ वर्ष, रा. कळपाणी जिल्हा बालाघाट/ मध्यप्रदेश व त्याचा भाचा विजेन्द्र पटले हे आपले मोटार सायकल क्र. एमएच ३५/एबी ८२८९ रोडचे कडेला ठेवुन उभे असतांनी यातील आरोपी ट्रॅक्टर चालाकने आपले ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे चालुवन तसेच जनतेच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या वेगात स्वत:चे ताब्यातील ट्रॅक्टर चालवुन मागेहुन धडक दिल्याने मोटार सायकलचे नुकसान करुन फिर्यादीस धडक मारुन जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २७९,३३७ भांदवि. सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. माहुर्ले पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

**४) ॲम्बुलन्स चालकांच्या निष्काळजीपणामुळे ट्रक चालकांस धडक देवुन ॲम्बुलन्स मधील दोन इसम जखमी झाल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक २४/०६/२०१७ चे २०.०० वा . दर. यातील नमुद आरोपीने आपल्या ताब्यातील वाहन हयगयीने, निष्काळजीपणे चालवुन ओव्हरटेक करतांनी समोरुन येणाऱ्या ट्रक क्र. सीजी ०७/सी ८२५६ ला धडक देवुन सोबत बसलेला शुभम गायधने व स्वत: गंभिर जखमी होण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी सुखदेव भुमेश्वर माथो वय ४५ वर्ष, रा. बट्टम बाजार हजारी बाग झारखंड ह. मु. ताटीबंद रायपुर (छ.ग) यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,३३७,३३८ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. चेके पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**५) संशयीतरित्या मिळुन गुन्हा नोंद . :–**

दिनांक २५/०६/२०१७ चे ०१.०० वा . दर. यातील अरोपी हा हस्तक्षेपनीय गुन्हा करण्याचे ईरादयाने शासकीय निवास्थानाचे परिसरात अंधारात लपुन संशयीत रित्या मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोउपनि. चेके यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १२२ मपोका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. चेके पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**६) क्षुल्लक कारणावरुन विटाने डोक्यावर मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक २५/०६/२०१७ चे १५.३० पासुन. यातील आरोपीचा साक्षदार महान याचे सोबत वाद सुरु असतांनी यातील फिर्यादी हा सोडविण्यास गेला असता आरोपीने फिर्यादीस तु कशाला मधात आला म्हणुन फिर्यादीचे डोक्यावर विटाने मारुन जखमी केल्याने फिर्यादी धिरज आनंदराव भेदे वय २५ वर्ष, रा. गांधी वार्ड भंडारा यांचे फिर्यादीचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३२४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि.फटींग पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**७) नायलॉन दोरीने गळफास लावुन युवकांचा मृत्यु :–**

दिनांक २४/०६/२०१७ चे २२.०० वा. दर. यातील मृतक नितीन गणपत शहारे वय २८ वर्ष, रा. सुभाष वार्ड मोहाडी याने त्याचे शेतावरील बांभळीच्या झाडाला नायलॉन दोरीने गळफास लावुन मरण पावल्याने फिर्यादी दिनु सदाशिव शहारे वय ८० वर्ष, रा. सुभाष वार्ड मोहाडी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे मोहाडी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गिऱ्हेपुंजे पोलीस स्टेशन मोहाडी हे करीत आहेत.

**८) विष प्राशन केल्याने औषधोपचार दरम्यान इसमाचा मृत्यु :–**

दिनांक २५/०६/२०१७ चे ०७.३० वा. दर. यातील मृतक चद्रशेखर शालीकराम चुऱ्हे वय ३९ वर्ष, रा. सावरी/ मुरमाडी याने दिनांक २४/०६/२०१७ ला आपल्या घरी विष प्राशन केल्याने त्यास औषधोपचारा करीता श्लोक हॉस्पीटल भंडारा येथे भरती केले असता उपचारा दरम्यान दिनाक २५/०६/२०१७ ला ०७.३० वा. मरण पावल्याने डॉक्टरी मेमो वरुन पो.स्टे भंडारा येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोशि. झंझाळ यांचे रिपोर्ट वरुन पोस्टे लाखनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. टेभुर्णे पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

**९) अवैध दारु देशी/ जुगार अडयावर धाडी . :–**

दिनांक २५/०६/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे आंधळगाव, साकोली व लाखांदुर येथे अवैध देशी दारु अडयावर धाडी घालुन एकुण ०४ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन २० लिटर हातभट्टी दारु किंमती १०००/–रु. १ लिटर ८० मिली देशी दारु किंमती ३००/–रु. तसेच जुगारातुन किंमती २४,७२०/–रु. असा एकुण किंमती २६०२०/–रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

१०) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक २५/०६/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १९५ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०४ तीन सिटर वाहनांवरती २६ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती १६५ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र.८८०५६५७२६२

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.